## शिवाजी विद्यापीठ स्वच्छता अभियान

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर,



**कोल्हापूर : महात्मा गांधी जयंतीदिनी शिवाजी विद्यापीठात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.**

वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी सकाळी साडेसात ते दहा या वेळेत स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यानिमित्त 'फिट इंडिया' दौडीचे उद्घाटन करण्यात आले. कचऱ्यासह परिसरातील गवत, खुरट्या वनस्पती आणि झुडपे, रस्त्याकडेला असणाऱ्या अशा बहुतांश झुडपांची या मोहिमेत सफाई करण्यात आली.

अभियानानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर गांधी अभ्यास केंद्राच्या संचालक तथा अधिष्ठाता डॉ. भारती पाटील यांनी उपस्थितांना अहिंसा, शांततेची तसेच स्वच्छतेची शपथ दिली. याप्रसंगी कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, डॉ. ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण समितीचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड यांच्यासह विविध अधिविभागांचे प्रमुख उपस्थित होते.

**महापालिकेतर्फे अभिवादन**

राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त महापालिकेतर्फे गांधी मैदान वरुणतीर्थवेस येथील महात्मा

लोकमत

# शिवाजी विद्यापीठाचा परिसर चकाचक

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थी, प्राध्यापक, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठातील स्वच्छता अभियानात श्रमदान करून महात्मा गांधी यांना जयंतीनिमित्त अभिवादन केले. सकाळी साडेसात ते १० या वेळेतील अभियानात रस्त्याकडेची काटेरी झुडपे, गवत, परिसरात पडलेला कचरा साफ केला; त्यामुळे हा परिसर चकाचक झाला.

या अभियानात कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे, आदी प्रमुख अधिकारी सहभागी झाले. मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रशासकीय सेवकांनी एन. सी. सी. भवन गेटपर्यंतच्या परिसरामध्ये, तर अधिविभागांनी आपापल्या परिसराची स्वच्छता केली. यात ४० ट्रॉली कचरा संकलित करण्यात आला. अभियानानंतर मुख्य इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. शिंदे यांच्या हस्ते महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली. यावेळी कोल्हापूर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी प्रमुख उपस्थित होते. गांधी अभ्यासकेंद्राच्या संचालक डॉ. भारती पाटील यांनी अहिंसा, शांततेची तसेच स्वच्छतेची शपथ दिली. यावेळी विद्यापीठातील अधिष्ठाता डॉ. पी. डी. राऊत, ए. एम. गुरव, विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आदी उपस्थित होते. क्रीडा अधिविभागातर्फे फिट इंडिया प्लॉगिंग दौड पार पडली.

## प्लास्टिक संकलित

सिंथेटिक ट्रॅकवर झालेल्या काही क्रीडा स्पर्धांमुळे त्या मैदानाच्या परिसरात चॉकलेट-बिस्किटांचे रॅपर मोठ्या प्रमाणात पडले होते. ही बाब लक्षात तेथील प्लास्टिक कचरा अर्ध्या तासात संकलित केला.

लोकमत

# गांधीजींची मूल्ये अंगीकारण्याची गरज


## देवानंद शिंदे : निशा मुडे-पवार यांच्या पुस्तकांचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महात्मा गांधी यांचा मार्ग अनुसरत असताना दुटप्पी भूमिका न घेता अहिंसा, सत्य ही त्यांची मूल्ये अंगीकारली पाहिजेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी मंगळवारी (दि. १) येथे केले.

विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या वतीने महात्मा गांधी यांची १५० वी जयंती आणि विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्या 'वृत्तपत्रीय लेखनाची दोन दशके', 'संवादशास्त्र' ही पुस्तके आणि 'सनीरेज' या काव्यसंग्रहाचे प्रकाशन अशा संयुक्त कार्यक्रमात ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, गांधीजी यांच्या तत्त्वांपासून प्रेरणा घेऊन त्या विचारांचा अवलंब करण्याची आणि आपण गांधीरूप होण्याचे धाडस दाखविण्याची गरज आहे. डॉ. निशा मुडे-पवार यांच्या पुस्तकांतून विचार आणि सर्जनशीलतेचा मिलाफ दिसून येतो.



शिवाजी विद्यापीठात मंगळवारी डॉ. निशा मुडे-पवार यांच्या पुस्तक आणि काव्यसंग्रहाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी डावीकडून रत्नाकर पंडित, दशरथ पारेकर, रवींद्र ठाकूर, भारती पाटील उपस्थित होत्या.

### पत्रकारितेचा प्रवास सांगितला

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात गांधी अभ्यासकेंद्राच्या समन्वयक डॉ. भारती पाटील यांचे 'महात्मा गांधीजी यांची पत्रकारिता आणि सद्य:स्थिती' या विषयावर व्याख्यान झाले. त्यामध्ये त्यांनी दक्षिण आफ्रिकेत 'इंडियन ओपिनियन' ते 'हरिजन' या वृत्तपत्रांच्या प्रकाशन कालावधीतील गांधीजी यांच्या पत्रकारितेचा प्रवास सांगितला.

या कार्यक्रमात ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, मराठी अधिविभागाचे माजी प्रमुख डॉ रवींद्र ठाकूर, डॉ. ग. गो. जाधव अध्यासनाचे चेअर प्रोफेसर डॉ. रत्नाकर पंडित यांनी मनोगत व्यक्त केले. शाहीर राजू राऊत यांनी पुस्तक प्रकाशनाबद्दल काव्यात्मक प्रतिक्रिया व्यक्त केली. यावेळी डॉ. सुमेधा साळुंखे, अनुराधा इनामदार, सुधाकर बर्गे, रिमा पाटील, मानसी पोवार, आदी उपस्थित होते. सचिन दिवाण यांनी सूत्रसंचालन केले.

# ‘मेडिकल इन्फर्मेशन’चे विद्यापीठात मिळणार धडे

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाने एम.एस्सी साठी वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्रामधील पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करून विद्यार्थ्यांसाठी अद्ययावत आणि कालसुसंगत शिक्षण व प्रशिक्षण उपलब्ध करण्याच्या दृष्टीने नवे दालन खुले केले आहे. महत्त्वाचे म्हणजे आंतरराष्ट्रीय सहकार्यातून चालविला जाणारा हा विद्यापीठातील पहिलाच अभ्यासक्रम आहे.

वैद्यकीय माहिती व्यवस्थापन शास्त्र (मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट) ही जागतिक स्तरावरील हेल्थकेअर उद्योगाच्या दृष्टीने उदयास आलेली एक अतिशय महत्त्वाची विज्ञानशाखा आहे. तिचे महत्त्व लक्षात घेऊन शिवाजी विद्यापीठाच्या जैवरसायनशास्त्र अधिविभागाने जर्मनीस्थित हॉश्चुल हॅनोव्हर युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाईड सायन्सेस अँड आर्ट्स या विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने या विषयाचा एम.एस्सीसाठी दोन वर्षांचा अभ्यासक्रम या वर्षीपासून शिवाजी विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध केला आहे. या अभ्यासक्रमांतर्गत अखेरच्या चौथ्या सत्रामध्ये दोन विद्यापीठांमध्ये स्टुडंट्स एक्स्चेंज उपक्रम राबविण्यात येणार असल्याने येथील विद्यार्थ्यांना जर्मनीतील विद्यापीठात जाऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील या क्षेत्रातील नवनवीन प्रवाहांचा वेध घेता येणे शक्य होणार आहे. या कालावधीतील विद्यार्थ्यांची तेथील निवास व भोजन व्यवस्था संबंधित विद्यापीठ करणार आहे.

“

हेल्थ केअर इंडस्ट्री आता इन्फॉर्मेटिक्स, आयटी आधारित काम करणारी आहे. या डाटा ड्रिव्हन उद्योगाला माहिती तंत्रज्ञानाच्या ज्ञानाबरोबरच हेल्थकेअर विश्लेषणाचे ज्ञान असणारे मनुष्यबळही आवश्यक आहे.

– डॉ. अतुल कापडी,
सदस्य अभ्यास मंडळ



# सामाजिक न्यायासाठी ढालेंचा लढा

कोल्हापूर टाइम्स टीम



शिवाजी विद्यापीठात आयोजित व्याख्यानात बोलताना ज्येष्ठ विचारवंत ज.वि. पवार. शेजारी डॉ. हरीश भालेराव व डॉ. जगन कराडे.

मंत्रीपद, खासदारकी अशा क्षणभंगुर आमिषाच्या मोहात न पडता सामाजिक न्यायासाठी प्रस्थापितांविरोधात अखेरपर्यंत संघर्षाचा निर्धार राजा ढाले यांचा होता आणि त्यांनी तो अखेरच्या श्वासापर्यंत निभावला, असे प्रतिपादन दलित पँथर चळवळीचे प्रवर्तक व ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार यांनी येथे व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्राच्या वतीने 'दलित चळवळ ते आंबेडकरी चळवळ: पँथर राजा ढाले यांचा परिप्रेक्ष्य' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. हरिष भालेराव अध्यक्षस्थानी होते.

ज. वि. पवार म्हणाले, लघु अनितकालिक चळवळीच्या विद्यापीठाचे राजा कुलगुरू होते. या लढ्याला महत्त्व प्राप्त करून देणारे 'विद्रोह' हे अनियतकालिक त्यांनी सुरू केले आणि तेव्हापासून मराठी साहित्यात दलित साहित्याची लाट निर्माण झाली. या चळवळीला दलित हे संबोधन असले तरी व्यवस्थेने लादलेले हे दलितत्व झुगारून त्यापासून उन्नत होण्यासाठी राजा ढाले सातत्याने आग्रही राहिले.

## ज्येष्ठ विचारवंत ज. वि. पवार यांचे प्रतिपादन

अध्यक्षीय भाषणात डॉ. हरिष भालेराव म्हणाले, राजा ढाले यांनी माणुसकीचा पाणउतारा करणारी व्यवस्था नाकारण्याचे बळ शोषित समाजात निर्माण केले. दलित ही नकारात्मक ओळख करून देणारा शब्द आम्ही राजा ढाले यांच्याच प्रेरणेने नाकारला. वैचारिक चळवळ केल्याखेरीज प्रस्थापितांविरोधातील बंड यशस्वी होऊ शकत नाही, याची जाणीवनिर्मिती ढाले यांच्या सामाजिक-साहित्यिक चळवळीने केली, हे त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे.

यावेळी केंद्राचे संचालक डॉ. जगन कराडे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. अविनाश भाले यांनी आभार मानले. यावेळी डॉ. पी.एस. कांबळे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, रमेश शिपूरकर, प्रा. विनय कांबळे, नामदेवराव कांबळे यांच्यासह शहर व परिसरातील अनेक मान्यवर नागरिक उपस्थित होते.

अधिसभेचे कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 OCT 2019
Times of India

# Send entire NSQF data by Oct 10: UGC

Times News Network

**Kolhapur**: Colleges across the country, which were granted permission to run various courses under the National Skill Qualifications Framework (NSQF) scheme have been asked to collate data of the current year's course-wise intake of students and faculty recruited and submit the same to the University Grants Commission (UGC).

The UGC had issued a notice regarding the same on October 1 asking all the institutions to upload the required data by October 10.

"The institutions are requested to register themselves and upload the data on the portal latest by October 10. The institutions should provide data for University Grants Commission approved courses only," it said, adding that apart from the students admitted in the current academic year, the total number of students (including those of all existing batches) should also be included in the details.